महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तु व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यामध्ये “उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)” उभारणी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जिविके-२०२५/प्र.क्र.१७/ई-९९८२३१/ योजना-१**

बांधकाम भवन, तळमजला २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
तारीख: ११ ऑगस्ट,२०२५

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मूलन करण्यासाठी “एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम” राबविण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमातंर्गत वैयक्तिक लाभार्थींवर भर देण्यात आलेला होता. सन १९९९ मध्ये “स्वर्ण जंयती ग्राम स्वरोजगार योजनेला” सुरुवात करुन त्यामध्ये ग्रामस्तरावरील महिलांचे संघटन करुन स्वयं सहाय्यता गटांची बांधणी व महिला सक्षमीकरण यावर भर देण्यात आला. सदर योजनेतंर्गत ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि.२७.०२.२००९ अन्वये विभागीय व जिल्ह्यास्तरावरील प्रदर्शन आयोजित करणे व जिल्हा व तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तद्नंतर, सन २०११ मध्ये केंद्र शासनाने “दीन दयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान” या अभियानाची सुरुवात केली. महाराष्ट्र राज्यात सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभागातंर्गत “महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान” या स्वतंत्र संस्थेची स्थापना करुन या संस्थेची संस्था नोंदणी, ही नोंदणी अधिनियम १८६० अन्वये केली आहे. सदरील अभियानाची अंमलबजावणी टप्पा-टप्पाने ३४ जिल्ह्यातील ३५१ तालुक्यांमध्ये करण्यात येत आहे. सद्यस्थितीत स्वयं सहाय्यता गटातील महिला त्यांच्या उपजीविका रोजगारासाठी छोटे-छोटे लघुउद्योग करतात आणि त्यामाध्यमातून विविध वस्तु व उत्पादनांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करत आहेत. या निर्मिती करण्यात आलेल्या वस्तु व उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी “महालक्ष्मी सरस” या माध्यमातून, जिल्हा व विभागस्तरावर सरस आणि विविध ठिकाणी भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शन, तसेच आठवडी बाजारातील स्टॉलद्वारे सुध्दा महिलांना त्यांच्या वस्तु व उत्पादने विक्रीसाठी प्रोत्साहीत करण्यात येते. यासाठी, “उमेदमार्ट” या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच ॲमेझॉन, फ्लिपकार्ट इत्यादी ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर देखील गटांची नोंदणी करण्यात येत आहे. तथापि, सदर वस्तु व उत्पादनांच्या विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

## शासन निर्णयः-

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तु व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यामध्ये "उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)" उभारणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अ. योजनेचे स्वरुपः-**

१. उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या स्वयं सहाय्यता समूहांना त्यांच्या वस्तु व उत्पादने विक्री करण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळावी या हेतुने "उमेद मॉल" उभारणी करण्यात येईल. सदर योजना ही राज्य पुरस्कृत योजना असुन पहिल्या टप्प्यामध्ये १० जिल्ह्यांकरिता १० उमेद मॉलची निर्मिती करण्यात येईल. तसेच, उर्वरित जिल्ह्यांमध्ये टप्प्या-टप्प्याने "उमेद मॉलची" निर्मिती करण्यात येईल.

२. उमेद मॉल बांधण्याकरिता प्रति जिल्हा कमाल रु. २० कोटी इतका खर्च अनुज्ञेय राहील. स्थानिक गरज व जागेची उपलब्धता विचारात घेता अपेक्षित खर्च निश्चित करण्यात येईल.

३. अभियानातील गटांना (स्वयं सहाय्यता समूहांना) चक्राकार पद्धतीने गाळे उपलब्ध करुन देण्यात यावेत, जेणेकरुन सर्व आलेल्या स्वयं सहाय्यता समूहांना त्यांच्या वस्तु व उत्पादनांकरिता आळीपाळीने/टप्प्या-टप्प्याने बाजारपेठ उपलब्ध होईल.

४. या उभारणी करण्यात येणा-या उमेद मॉलमध्ये त्या जिल्ह्यात असणा-या गटांची संख्या लक्षात घेऊन त्यानुसार त्यामधील गाळ्याची संख्या निश्चित करण्यात यावी.

५. सदर उमेद मॉलमध्ये महिलांना सभा घेण्यासाठी एका हॉलची व्यवस्था असावी.

६. सदर "उमेद मॉल" हे प्रामुख्याने जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या जमिनीवर उभारण्यात यावेत.

**ब. अमंलबजावणी कार्यपद्धतीः-**

१. राज्यातील १० जिल्ह्यामध्ये उमेद मॉल निर्मिती करिता जिल्हा परिषदेकडुन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांच्या मार्फत प्रस्ताव मागविण्यात यावेत. प्राप्त प्रस्तावांची छाननी व तपासणी करुन ज्या जिल्ह्याच्या ठिकाणी उमेद मॉलच्या बांधकामासाठी आवश्यक शासकीय जमीन (जिल्हा परिषदेच्या ताब्यातील) निर्बाध्यरीत्या उपलब्ध आहे तसेच, सदरहू जमीन/क्षेत्र हे जिल्ह्याच्या/शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे अशा १० जिल्ह्याची निवड मा. मुख्यमंत्री महोदयांशी सल्ला मसलत करुन अंतिम करण्यात येईल.

२. जिल्हा विक्री केंद्राच्या बांधकामाचा आराखडा तयार करणे, त्याचप्रमाणे विहीत कार्यपध्दतीने निविदा प्रक्रीया, प्रशासकीय बाबी इ. कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांच्या मार्फत करण्यात यावी.

३. आराखड्यास तांत्रिक मान्यता देण्याकरीता मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य, ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा हे सक्षम राहतील. तसेच, प्रशासकीय मान्यता शासन मान्यतेने ग्रामविकास विभागाकडून देण्यात यावी.

४. या व्यतिरिक्त "उमेद मॉल" बांधकामास अन्य समितीच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

५. एकुण १० जिल्ह्यामध्ये प्रस्तावित असलेल्या "उमेद मॉल" च्या उभारणी संदर्भात विहीत नियमावली सनियंत्रण व देखभाल इत्यादीबाबत मार्गदर्शक सुचना ग्राम विकास विभागाच्या स्तरावर शासन मान्यतेने वेळोवेळी देण्यात येतील.

६. उमेद मॉलच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल.

२. प्रति उमेद मॉल अपेक्षित खर्च रु.२० कोटी याप्रमाणे १० जिल्ह्यांमधील उमेद मॉल करिता रु.२०० कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरचा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे अनौ.क्र.१५०/२०२५/का.१४४४ व अनौ.क्र.४४२ए/व्यय-१५ दि.२६.०६.२०२५, नुसार निर्गमित करण्यात येत आहे

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८१११४२१५४००२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARSHA M BHAROSE

Digitally signed by VARSHA M BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2F3096A175796CC670522C4AFF97DA20B708981B5122E87C8346C4CC7468F821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA M BHAROSE
Date: 2025.08.11 17:44:55 +05'30'

**व. मुं. भरोसे**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. विधान सभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, मुंबई.

६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई
७. महालेखापाल (लेख व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई नागपूर
८. मा. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशाकीय विभाग (सर्व).
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई
१०. संचालक अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११. संचालक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त (सर्व).
१३. जिल्हाधिकारी (सर्व).
१४. जिल्हा कोषगार अधिकारी सर्व.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१६. ग्राम विकास व पंचायत राज विभागातील सर्व सहसचिव/ उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१७. उप सचिव, नियोजन (का-१४११ व १४१४) मंत्रालय मुंबई.
१८. वित्त विभाग (का. व्यय-१५ व अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
१९. उपायुक्त (विकास), सर्व, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
२०. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व.
२१. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कार्यासन योजना-२/योजना-३/वित्त-१
२२. निवड नस्ती (कार्यासन योजना- १)